Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso 100% Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

# हैं तय्यार हम...




**इन्स्टिट्यूट ऑफ एअरक्राफ्ट मेंटनन्स इंजिनियरिंग :** डावीकडून लक्ष्मीकांत पाटील, रत्नेश पांडे, राजकुमार वर्मा, शाश्वत रंजन, अशोक वाठोरे, प्रभाकर कुमार, मनोज तलवारे (डायरेक्टर ऑफ आयएएमई), सिद्धेश्वर कदम, कनक तलवारे, राजन कुमार, शीतल क्षीरसागर, योगेश देशमाने, दीप्ती वायदंडे, बालाजी वाघमारे.



**कॅनपॅक रनर ग्रुप**

(उभे) के.व्हीव्ही चंद्रा शेखरराव, रंगनाथ बी, योगेश निकम, आनंद कदम, संतोष लाखवाल, विवेक रोटवाडकर, संतोष इंगळे, राकेश बुदिमे, के.गोविंदराव, जनार्दन काळे, राहुल जोशी, अनिरुद्ध कुलकर्णी, सचिन गडप्पा, हेतल बेडवाल, विशाल आढावे, (बसलेले) राहुल मोरे, प्रेमपाल सिंग, प्रवीण बंदुछोडे, मनोज चौधरी, रूपेश शिंदे, आनंद पवार,मनोज पाणिग्रही, प्रमोद दास, अभिषेक उपाध्याय, विष्णू भोये, विकास भाती, जितेंद्र पटेल, अक्षय पाटील.

## ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

**स्पर्धा**

- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

## भारतीच्या लग्नाचे मित्रही करतायेत प्री-सेलिब्रेशन!



आपल्या आवाढव्य वजनाच्या कॉमेडियन भारती सिंहने कधीच स्वतःला कमी लेखले नाही. उलट त्याच जोरावर तिने यश मिळवले. आता लवकरच भारती हर्ष लिंबाचियासह लग्नबंधनात अडकणार आहे. सध्या भारती लग्नाच्या तयारीत व्यस्त असली, तरीही तिच्या लग्नाच्या तयारीच इत्थंभूत बातमी ती सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांपर्यंत कळवत असते. मात्र, आता तिच्या मित्रांनीही तिच्यासाठी एक फनी व्हिडीओ केला आहे. या व्हिडिओत अनू मलिक, कृष्णा अभिषेक, सुदेश लहरी आणि मंत्रा भारतीला लग्नासाठी आपल्या आगळ्या वेगळ्या अंदाजात खास शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी भारतीला शुभेच्छा देण्यासाठी हॅशटॅग भारती की बारात या नावाने एक कॅम्पेन सुरू केले आहे आणि सध्या सोशल मीडियावर अपलोड करण्यात आलेला हा व्हिडिओ या कॅम्पेनचा एक भाग आहे. व्हिडिओत हे सर्व सेलिब्रिटी असा अभिनय करत आहे, जणू भारतीच्या लग्नाच्या बातमीने त्यांना अचंबित केले. नंतर मात्र हे सर्व तिला शुभेच्छा देत आहेत. येत्या ३ डिसेंबरला भारती हर्ष लिम्बचियासोबत बोहल्यावर चढणार आहे. त्यामुळे भारतीप्रमाणेच तिचे मित्रमंडळीही लग्नाचे प्रि-सेलिब्रेशनच्या मुडमध्ये रंगल्याचे पाहायला मिळत आहे.

## बंदगीला म्हटले 'फिमेल इमरान हाशमी'!



एका शोची स्पर्धक बंदगी कालरा पुनीश शर्मासोबतच्या जवळीकतेमुळे खूपच चर्चेत आहे. कारण, या शोच्या घरात या दोन स्पर्धकांनी अक्षरशः अश्लीलता पसरविली असून, प्रेक्षकांमध्येही त्यांच्याबद्दल आता संताप व्यक्त केला जात आहे. या दोघांचा हा प्रताप बघून शोचा सीझन तीनचा विजेता विंदू दारा सिंग हा तर अक्षरशः संतापला आहे. त्याने एक टिवट करून बंदगीला फिमेल इमरान हाशमी असे म्हटले आहे. या आठवड्यात घरातील स्पर्धकांमध्ये कॅप्टनसीकरिता एक टास्क घेण्यात आला होता. यावरूनच विंदूने टिवट केले असून, त्यात त्याने म्हटले की, घरातील फिमेल इमरान हाश्मी नवी कॅप्टन बनली आहे. 'बंदगीने बऱ्याचदा पुनीशसोबत बिनधास्तपणे लिपलॉक सीन दिले. त्याचबरोबर ती बऱ्याचदा कोजी होतानाही बघावयास मिळाली. या शोच्या तिसऱ्या सीझनमध्ये सहभागी झालेला विंदू दारा सिंग या शोचा विजेता आहे. तो गेल्या काही काळापासून या शोला सातत्याने फॉलो करीत आहे. विंदूने केवळ बंदगीबद्दलच नव्हे, तर नॉमिनेशन प्रोसेसनंतर हिना खान आणि आकाश ददलानी यांच्यावरही कमेंट केले. नॉमिनेशनदरम्यान हिनाला सेफ करण्यासाठी लवने त्याच्या कपाळावर मेहंदीने जिरो असे लिहिले होते. मात्र, नंतर हिनाने मेकअपच्या साहाय्याने हे नाव काढून टाकले.

## दीपिका-इब्राहिम लवकरच करणार लग्न!



दीपिका कक्कर अनेक वर्षांपासून एका मालिकेत काम करत होती. या मालिकेत शोएब इब्राहिम तिच्यासोबत प्रमुख भूमिकेत झळकत होता. या मालिकेच्या सेटवरच शोएब आणि दीपिका एकमेकांच्या प्रेमात पडले. त्यांनी आपल्या नात्याची कबुली अनेकवेळा मीडियासमोर दिली असून, शोएबने मीडियासमोर दीपिकाशी लग्न करण्याची इच्छा देखील व्यक्त केली आहे. एका मालिकेत एंट्री होण्याआधी दीपिकाचे लग्न झालेले होते. मात्र, काही कारणास्तव तिचे लग्न तुटले. त्यानंतर तिच्या कठीण काळात शोएबने तिला आधार दिला आणि तिची मदत केली. दुसरीकडे शोएबच्या पडत्या काळात दीपिकाने त्याला साथ दिली. त्याच्या पाठीशी ठामपणे ती उभी राहिली. मात्र, तोवर एकमेकांना ते प्रेमात असल्याचे जाणवले नव्हते. मात्र, शोएबने ही मालिका सोडल्यानंतर दोघांनाही एकमेकांची कमतरता जाणवू लागली. या काळात दिपिका फार खचून गेली होती. त्यानंतर मात्र दोघे जवळ आले आणि त्यांच्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले.

## अदाने छोट्या पडद्यावरील मालिकांना दिला नकार!



एका मालिकेचा पहिला सीझन आणि दुसरा सीझन खूप हिट ठरला. या दोन्ही सीझनला रसिकांच्या मिळालेल्या प्रतिसादामुळे या मालिकेचा तिसरा सीझन येणार असल्याच्या सध्या चर्चा सुरू आहेत; मात्र मिळालेल्या माहितीनुसार, पहिल्या भागापासून दुसऱ्या भागापर्यंत छोट्या पडद्यावरची नागिन बनलेली मौनी रॉय मात्र, या शोच्या तिसऱ्या सीझनमध्ये दिसणार नाही. शेशा आणि रुचिकाचा रोल करणारी ॲक्ट्रेस अदा खान हिनेही तिसऱ्या भागाला ना-ना म्हटले आहे, त्यामुळे निर्मात्यांनी तिच्या भूमिकेसाठी नव्या ॲक्ट्रेसचे ऑडिशनही सुरू केले आहे. सध्या मालिकेमुळे घराघरात पोहोचलेल्या अदा खानलाही आता सिनेमात झळकण्याची इच्छा असल्याचे कळतंय. त्यामुळे सध्या मालिका किंवा टीव्हीवरचे प्रोजेक्ट्सला नकार देत असल्याचे समजतंय. अक्षय कुमारचा आगामी सिनेमा 'गोल्ड'मधून मौनी बॉलिवूडमध्ये डेब्यू करणार आहे.



यंदा कर्तव्य आहे, चेकमेट, डबलसीट, ती सध्या काय करते, दगडी चाळ, माझा नवरा तुझी बायको आदी मराठी चित्रपटांद्वारे प्रमुख भूमिका साकारलेला आणि तरुणांच्या गळ्यातला ताईत अंकुश चौधरी आपणास स्टनिंग लूकमध्ये दिसत आहे. विशेष म्हणजे त्याचा हा लूक त्याने त्याचा आगामी चित्रपट 'देवा : एक अतरंगी'यासाठी केला असून, तरुणांना आकर्षित करीत आहे. या चित्रपटाच्या प्रवासाबाबत अंकुशसोबत मारलेल्या दिलखुलास गप्पा...

cnx. Focus
रवींद्र मोरे

# स्टनिंग लूक अविस्मरणीय ठरेल!



◆ **प्रश्न : या चित्रपटात तुझा स्टनिंग लूक दिसून येत आहे, याबाबत काय सांगशील?**

– प्रत्येक चित्रपटात काहीतरी वेगळेपण असावे, जेणेकरून ते लोकांच्या लक्षात राहील. या चित्रपटातही जो माझा लूक आहे, तो चित्रपटातील भूमिकेला अनुसरूनच आहे. चित्रपटाची टॅगलाइन 'एक अतरंगी' हे आहे. त्यानुसारच माझी हेअरस्टाइल आणि कपडे आहेत. माझ्या मते हा लूक लोकांना अविस्मरणीय ठरणारा आहे.

◆ **प्रश्न : या चित्रपटाची शूटिंग कोकणात झाली आहे, तेथील अनुभव कसा वाटला?**

– खूपच छान अनुभव आला. तिथे प्रत्येक वेळी प्रत्येक गोष्ट नवीन वाटली. आम्ही कोकणात पावसातही शूटिंग केली आणि थंडीतही. तेथील निसर्गरम्य परिसर मनाला खूपच आल्हाददायक वाटायचा. माझ्या मते आपल्या महाराष्ट्रातच बरेच असे काही चांगले लोकेशन्स आहेत, जे शूटिंगसाठी अगदी परफेक्ट आहेत. त्यामुळे मला नाही वाटत की, शूटिंगसाठी बाहेर जाण्याची गरज पडेल.

◆ **प्रश्न : या चित्रपटाचे वेगळेपण काय आहे?**

– आज प्रत्येकाच्या आयुष्यात काही ना काही अडचणी, समस्या आहेत. तर या चित्रपटातील देवा हे कॅरेक्टर असे आहे, जे इतरांना सकारात्मक ऊर्जा प्रदान करते. शिवाय या चित्रपटातील नायिका तेजस्विनी पंडित ही लेखिकेच्या भूमिकेत असून, ती देवाला शोधण्याचा प्रयत्न करीत असते. तिला खूप लोक भेटतात; मात्र तिला अपेक्षित देव भेटत नाही. मात्र, माझ्या रूपाने तिला हा देव भेटतो. हा देव नेहमी इतरांना सकारात्मक ऊर्जा प्रदान करत असतो, ज्यामुळे त्यांच्या समस्या सुटतात. खरे म्हणजे ही ऊर्जा प्रत्येकाच्या अंतरंगात लपलेली आहे. त्याच ऊर्जेचे महत्त्व या चित्रपटात दाखविलेले आहे.

◆ **प्रश्न : या चित्रपटाची नायिका तेजस्विनी पंडितसोबत तुझी केमिस्ट्री कशी होती?**

– तेजस्विनी खूपच सेन्सेटिव्ह ॲक्ट्रेस आहे. अगं बाई अरेच्चा, मी सिंधुताई सपकाळ, वावटळ, रानभूल आदी चित्रपटांतील तिने साकारलेली भूमिका अत्यंत गौरवास्पद आहे. तिच्यासोबत काम करण्याचा अनुभव मला खूपच वेगळा वाटला, तसेच खूप मजाही आली.

◆ **प्रश्न : मराठीतही येऊ लागलेल्या वेगळ्या धाटणीच्या चित्रपटांना विरोध होताना दिसत आहे, याबाबत काय सांगाल?**

– मी याबाबत काहीच प्रतिक्रिया देऊ इच्छित नाही. उगाच त्याचा परिणाम माझ्या आगामी चित्रपटावर होईल.



## साराला कशाची वाटतेय भीती?

सैफ अली खान व अमृता सिंगची मुलगी सारा अली खान आणि श्रीदेवीची लेक जान्हवी कपूर यांच्या डेब्यू चित्रपटाची घोषणा झालीयं. एकता कपूर निर्मित आणि अभिषेक कपूर दिग्दर्शित 'केदारनाथ' चित्रपटामधून सारा डेब्यू करतेय. तर जान्हवी कपूर ही करण जोहर निर्मित आणि शशांक खेतान दिग्दिर्शित 'धडक'मधून डेब्यू करणार आहे. डेब्यूच्या या घोषणेसोबतच दोघींची तुलनाही सुरु झालीय. आता याच तुलनेच्या अनुषंगाने एक वेगळी बातमी आहे. होय, जान्हवीच्या डेब्यू सिनेमाचे पोस्टर रिलीज होताच सारा अली खान म्हणे, चिंतीत झाली आहे. तिला दबाव जाणवू लागला आहे. जान्हवीचा डेब्यू सिनेमा 'धडक' हा 'सैराट' या सुपरडुपर हिट मराठी चित्रपटाचा हिंदी रिमेक आहे. 'धडक'चे पोस्टर रिलीज होताच जान्हवी अचानक चर्चेत आली आणि त्यातुलनेत सारा काहीशी झाकोळली गेली. याचमुळे सारा टेंशनमध्ये आलीय. खुद्द एकता कपूरने याचा खुलासा केला आहे. जान्हवी कपूरशी सुरु असलेल्या तुलनेमुळे सारा काहीशी दबावात आली आहे, असे एकता म्हणाली. शिवाय अशी तुलना योग्य नसल्याचे सांगत आपण या मुलांवर विनाकारण दबाव वाढवत असल्याचेही एकताने म्हटले आहे. ही मुले लहान आहेत आणि आपल्या मेहनतीच्या जोरावर काही मिळवू पाहत आहे. त्यांना एकटे सोडले जायला हवे. आपण असे करणार नसू तर ही मुले वेडी होतील. ते इथे कलाकार बनायला आली आहेत. सारा ही अतिशय गुणी अभिनेत्री आहे. तितकीच गोड मुलगी आहे. सारा व जान्हवी एकत्र डेब्यू करणार आहेत, हे ठीक पण त्यांचे नशीब त्या स्वतः घडवणार आहेत, असे एकता म्हणाली.

## अनुष्काने नाकारली करण जोहरची ऑफर!



'बाहुबली २' नंतर प्रभासची मागणी वधारली आहे. केवळ प्रभासच नाही तर 'बाहुबली'ची देवसेना अनुष्का शेट्टी हिची मागणीही वाढली आहे. प्रत्येक दिग्दर्शक निर्माता प्रभास, अनुष्का यांना आपल्या चित्रपटात घेऊ इच्छित आहे. पण या दोघांची फी इतकी की, कुणालाही त्यांना साईन करण्याची हिंमत होत नाही. दुसऱ्या कुणाचे सोडाच; पण खुद्द करण जोहरनेही इतकी फी देण्यास असमर्थता दर्शवली आहे. करण जोहरला प्रभाससोबत चित्रपट करायचा होता. पण प्रभासने इतका मोठा आकडा सांगितला की, करणच्या भुवया उंचावल्या. मग काय प्रभाससोबत चित्रपट बनवण्याचा विचारच करणला सोडून द्यावा लागला. 'देवसेना' अनुष्काबद्दलही करणसोबत असेच काही घडले. प्रभास नाही तर किमान अनुष्काने तरी आपल्या चित्रपटात काम करावे, असे करणचे मत होते. करणने लगेच अनुष्काशी संपर्क साधला. पण अनुष्काने सुरुवातीलाच चित्रपटाच्या कथेबद्दल नाक मुरडले. करणने मानमिनत्या केल्यात. तेव्हा कुठे अनुष्का मानली. पण यानंतर तिने मानधनाचा इतका मोठा आकडा समोर केला की, करणलाच घाम सुटला. मग काय, प्रभासपाठोपाठ अनुष्कासोबत काम करण्याचा इरादाही करणला सोडून द्यावा लागला.

## रणवीर-शाहिद दीपिकावर नाराज?







दीपिका पादुकोण सध्या चर्चेत असून दुर्दैवाने चांगल्या नाही तर काहीशा वाईट कारणाने. दीपिकाचा 'पद्मावती' हा आगामी चित्रपट सध्या वादात सापडला आहे. केवळ वादातच नाही तर चित्रपटाचे रिलीजही वांद्यात सापडले आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर चित्रपटातील लीड ॲक्टर रणवीर सिंग आणि शाहिद कपूर हे दोघे दीपिकावर नाराज असल्याची चर्चा आहे. 'पद्मावती'च्या प्रेस कॉन्फरन्सला जाताना दीपिकाने आम्हाला सांगितलं देखील नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. एका मुलाखतीत दीपिका रिॲक्ट झाली. 'हे सगळे बालीशपणाचे आहे. मी इथे आहे आणि इथे बसण्याचे मला स्पष्टीकरण द्यावे लागत असेल तर ते दुर्दैवी आहे. 'पद्मावती'च्या ३डी ट्रेलर लाँचला मी हजर होते; कारण माझ्या डायरेक्टरनी मला तिथे हजर राहण्याचे निर्देश दिले होते. मी तिथे असणे त्यांच्यासाठी आवश्यक होते. चित्रपटाचे अखेरच्या टप्प्याचे शूटिंग सुरू होते आणि अशा स्थितीत त्यांनी मला या ठिकाणी जाण्यास सांगितले. अखेरच्या टप्प्यात एक एक दिवस किती महत्त्वाचा असतो, हे तुम्ही समजू शकता. त्यामुळेच त्यांनी मी या इव्हेंटला असावे, असे भन्साळींना वाटले आणि मी केवळ त्यांचे निर्देश पाळले,' असे दीपिका म्हणाली.